## शेतीपूरक व्यवसायासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम सन 2013-14
## मार्गदर्शक सूचना
## शासन निर्णयाच्या अधिन राहून

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रातील 33 जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी शेतीपूरक व्यवसाय करण्याकरीता शेती कौशल्य वृद्धी संदर्भातील प्रशिक्षण देवून शेतीतील उत्पादकता वाढविण्याचे उदिष्ट विचारात घेवून कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवावयाचा आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमातून शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायाचे कौशल्य शिकायचे आहे, जेणेकरून ते आत्मसात केलेल्या कौशल्याचे आधारे शेती पूरक व्यवसाय करून स्वत:चे उत्पन्न वाढवतील. शेतीपूरक निरनिराळे व्यवसाय करणारे नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी ज्यांनी त्या व्यवसायासाठी आवश्यक कौशल्य आत्मसात करून स्वत:चे कुटूंबातील व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे व उत्पादनात वाढ केलेली आहे. अशा शेतकऱ्यांकडे त्या व्यवसायाचे प्रशिक्षण घेतल्यास प्रभावी होतील म्हणून अशा शेतकऱ्यांच्या शेतावर " शेती कौशल्य शेतीशाळा " ( Farming Skills Farm School ) आयोजित कारावयाचे आहेत.

सदरहू प्रशिक्षण कार्यक्रम त्या त्या विभागातील कृषि विद्यापिठ, कृषि संशोधन केंद्र तसेच वसंतराव नाईक राज्य कृषि व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था नागपूर व तीच्या सात सहयोगी रामेती संस्था यांचे मार्फत शेती कौशल्य शेतीशाळेचा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येईल. तसेच कृषि विज्ञान केंद्र, स्वंयसेवी संस्था कडील प्रशिक्षण केंद्र, जिल्हा प्रशिक्षण केंद्र त्याचबरोबर राष्ट्रीयकृत बँकां कडील प्रशिक्षण केंद्र व संलग्न विभागाकडील प्रशिक्षण केंद्रावर कृषि कौशल्य विकास कार्यक्रम राबवण्यात येईल.

### 1. शेतीपूरक व्यवसायांची निवड :

जिल्ह्यातीलकृषि हवामान व परिस्थिती विचारात घेवून शेतीपूरक व्यवसायांची यादी तयार करणेत यांवी.

दुग्धव्यवसाय,

शेळी/ मेंढी पालन,

कुक्कुटपालन,

रेशिम उत्पादन,

मत्स्य उत्पादन,

शेडनेट मधील पुष्पोत्पादन/ भाजीपाला उत्पादन,
मधुमक्षिका पालन,
रोपवाटीका,
औषधी सुगंधी वनस्पती उत्पादन,
शेतमाल उत्पादन प्रक्रीया,
ठिबक सिंचन संच देखभाल दुरूस्ती,
सिंचन पंप / ऑईल इंजीन देखभाल व दुरूस्ती,
कृषि अवजारे देखभाल दुरूस्ती,
फवारणी यंत्र देखभाल व दुरूस्ती
दाल प्रक्रीया
तेल प्रक्रीया
नाचणी पापड तयार करणे
काजू प्रक्रीया
हळद पावडर तयार करणे
संत्रा प्रक्रीया
आंबा प्रक्रीया
मसाला पिके प्रक्रीया
कांदा साठवण
इमु पालन
वराह पालन
बदक पालन
ससे पालन
द्राक्ष प्रक्रीया
नारळ उपपदार्थ तयार करणे
नारळ प्रक्रीया
करवंद प्रक्रीया
पपई उपपदार्थ तयार करणे
दुग्धजन्य उपपदार्थ तयार करणे
ऍझोला उत्पादन
रंगीत मासे उत्पादन
मत्स्य खाद्य उत्पादन
गोड्या पाण्यातील कोळंबी उत्पादन
लाख लागवड / उत्पादन
खस गवत उत्पादन
बांबू रोपवाटीका
मलबेरी ( Mulberry ) रोपवाटीका

इ. व्यवसायांची यादी करतांना वेगवेगळ्या वर्गवारीतील शेतकरी जसे मोठे, मध्यम, लहान, अत्यल्प भूधारक व भूमिहिन यामधील सुविधा असलेले व सुविधा नसलेले शेतकरी व इतर यांचेकरीता कोणते व्यवसाय उपयुक्त राहतील याचा वरील प्रत्येक वर्गवारीनिहाय विचार व्हावा. त्याप्रमाणे प्रत्येक तालुक्याची स्थिती, शेतकरी, भूमिहिन यांची वरालप्रमाणे वर्गवारी विचारात घेवून प्रत्येक व्यवसायाकरीता बाजारपेठ व वाव यांचा प्रथम विचार करूनच पूरक व्यवसायांची यादी करावी आणि अशा प्रकारे यादी केल्यावर तालुक्याची गरज, उपलब्ध संसाधने, बाजारपेठ, वाव, शेतकऱ्यांची मानसिकता विचारात घेऊन व्यवसायाची क्रमवारी ठरवावी.

## 2. व्यवसायासाठी आवश्यक कौशल्य निश्चित करणे :

निवडलेल्या प्रत्येक व्यवसायासाठी कोणते कौशल्य तंत्र आत्मसात करावे लागेल हे निश्चित करून त्याची यादी करणे आवश्यक आहे. यासाठी त्या व्यवसायातील तज्ञ आणि यशस्वी व्यावसायिक यांची मदत घेण्यात यावी. हे यासाठी आवश्यक आहे की, त्या व्यवसायातील यशस्वी व्यावसायिक किंवा तज्ञच तो व्यवसाय करण्यासाठी कोणते कौशल्य आणि तंत्र अवगत करणे आवश्यक आहे हे सांगू शकतो. व्यवसायनिहाय अवगत करणे आवश्यक असलेल्या कौशल्याची / तंत्राची यादी तयार केल्यावर त्याची देखील वर्गवारी करणे आवश्यक आहे. उदा. कौशल्य आलेच पाहिजे, कौशल्याबद्दल सखोल ज्ञान असावे, आणि माहिती असावी.

निवड केलेल्या प्रत्येक व्यवसायाकरीता वरीलप्रमाणे सूचना विचारात घेवून त्या व्यवसायातील यशस्वी व्यावसायिक आणि तज्ञांचे सल्याने प्रथम कौशल्यांची यादी तयार करावी आणि नंतर त्यांची वर्गवारी करावी.

## 3. नाविन्यपूर्ण यशस्वी व्यावसायिकांची निवड :

व्यवसाय कौशल्य प्रशिक्षणासाठी निवड केलेल्या व्यवसायाचे प्रशिक्षण आयोजित करणेकरीता त्या व्यवसायातील नाविन्यपूर्ण यशस्वी व्यवसायिकांची निवड करणे आवश्यक आहे. हे प्रशिक्षण नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी, विद्यापिठांचे संशोधन केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, शासकीय प्रक्षेत्र किंवा स्वयंसेवी संस्था इ. पैकी ज्या ठिकाणी निवड केलेल्या व्यवसायासाठी आवश्यक कौशल्य शिकवू शकणारे तज्ञ आहेत व त्या ठिकाणी प्रत्यक्ष तो व्यवसाय केला जातो, अशांची तालुकानिहाय माहिती घेवून यादी तयार करावी.

## 4. प्रशिक्षणासाठी शेतकऱ्यांची/ भूमिहीनांची प्रशिक्षणार्थी म्हणून निवड :

शेतीपूरक प्रत्येक व्यवसायातील प्रशिक्षणाकरीता शेतकरी व भूमिहिन शेतमजूर, महिला शेतकरी, अल्प - अत्यल्प शेतकरी तसेच समूह शेती गटातील शेतकऱ्यांची निवड करावी.

निवड करताना त्यांची गरज त्या व्यवसायाकरीता त्यांचे परिसरात असलेला वाव, त्यांचेकडे असलेल्या सोयी/ सुविधा आणि त्यांची आवड विचारात घेवूनच प्रशिक्षणासाठी त्याची निवड करणेत यांवी. निवड प्रक्रीया पूर्ण करणेपूर्वी प्रत्येक इच्छूक प्रशिक्षणार्थीकडून सोबतचे नमुन्यात अर्ज प्राप्त करावा. प्राप्त अर्जाची छाननी वरील निकषावर करून नंतरच प्रशिक्षणार्थींची निवड यांदी तयार

करावी. यांप्रमाणे तालुकानिहाय, व्यवसाय निहाय प्रशिक्षणार्थींची यादी तयार करणेत यावी. त्यांचेकडून प्रशिक्षणाला ते संपूर्ण वेळ उपस्थित राहतीलच याचे हमीपत्र घ्यावे.

## 5. तज्ञ प्रशिक्षकाची निवड :

प्रशिक्षणाचे वेळी प्रशिक्षणार्थींचे प्रश्नांना शास्त्रोक्त व वस्तुनिष्ठ उत्तर देवून समाधान करणेसाठी प्रत्येक कौशल्याची शास्त्रोक्त माहिती देण्याकरीता विद्यापिठाचे, संशोधन केंद्रावरील किंवा संबंधित विभागातील तज्ञांची मदत घेणे आवश्यक आहे. यासाठी कौशल्याधारित प्रशिक्षणासाठी विषय निहाय / कौशल्यनिहाय तज्ञांची निवड करण्यात यावी. याप्रमाणे प्रत्येक प्रशिक्षणाकरीता तज्ञ प्रशिक्षक निश्चित करण्यात यावे, तज्ञांची निवड करतांना ते विद्यापिठाचे, संशोधन केंद्रावरील, कृषि विज्ञान केंद्र, याबरोबरच अशासकीय संस्था किंवा खाजगी संस्था या मधील तज्ञांची तसेच शेतकरी उद्योजक यांची देखील निवड करणेत यावी. या तज्ञांची निवड करताना त्यांना त्या व्यवसायाचे / कौशल्याचे सखोल ज्ञान व्यावहारीक उपयुक्तता, प्रत्यक्ष क्षेत्रिय अनुभव, कौशल्य व कौशल्य आत्मसात करणेकरीता कोणत्या प्रकारची पद्धती अवलंबावी किंवा क्रिया कराव्यात याची सखोल माहिती असावी, त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविता आले पाहिजे व सरळ सोप्या भाषेत संवाद साधण्याचे कौशल्य असले पाहिजे या निकषावर तज्ञांची निवड करणेत यावी.

## 6. सुलभकर्त्यांची निवड : (Facilitator)

व्यवसाय कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम नियोजनानुसार चालविण्याकरीता आणि या कार्यक्रमाला समन्वय राखणेकरीता संबंधित विभागातील जबाबदार अधिकाऱ्यची सुलभकर्ता (Facilitator) म्हणून निवड करण्यात यावी. समजा एकाच व्यवसायाचे त्या जिल्हयात एकाचवेळी दोन किंवा तीन प्रशिक्षण शेतशाळा आयोजित करायचे झाल्यास तेवढ्या सुलभकर्त्याची निवड करण्यात यावी त्याचप्रमाणे एक - दोन अधिकाऱ्यांची अतिरिक्त सुलभकर्ते म्हणून निवड करणेत यावी जेणेकरून कोणताही सुलभकर्ता गैरहजर वा रजेवर असल्यास प्रशिक्षण कार्यक्रम थांबणार नाही.

सुलभकर्ता निवडताना त्यांना क्षेत्रीय कामाची आणि प्रशिक्षणाची आवड असावी. तांत्रिक ज्ञान असावे त्याचप्रमाणे त्या क्षेत्रातला अनुभव असणे अत्यावश्यक आहे या बरोबरच कार्यक्रमांची आयोजन क्षमता असावी म्हणजे प्रत्येक कार्यक्रमाकरीता सूचना देण्याची गरज भासणार नाही.

संबंधित विभागाचे जिल्हाप्रमुखांनी त्यांचे अधिनस्त तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांचे सहकार्याने वर नमूद केल्याप्रमाणे शेतीशाळा राबविणेत सक्षम अधिकारी/ कर्मचारी यांची निवड करून यादी तयार करावी. जिल्हा प्रमुखांनी निवड केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची कार्यशाळा रामेती आयोजित करेल आणि त्यातून शेतीशाळा आयोजित करणेकरीता सुलभकर्त्यांची निवड करणेत येईल. कृषि विभागाव्यतिरिक्त इतर विभागाचे सुलभकर्ते प्रशिक्षणानंतर शेतीशाळा नियोजनासाठी व अंमलबजावणीसाठी भविष्यात उपलब्ध राहतील. यासाठी त्यांचे विभाग/ जिल्हा प्रमुखांचे सल्याने सुलभकर्त्याकडून बंधपत्र / हमीपत्र करून घेण्यात यावे.

## 7. शेतीशाळेकरीता नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी यांची निवड :

व्यवसाय कौशल्य प्रशिक्षणाकरीता त्या विषयावरील शेतीशाळा आयोजित करणेसाठी योग्य नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकऱ्यांची निवड करावी. ही निवड करण्यामागचा हेतू हा की त्यांनी स्वअनुभवातून सातत्याने प्रयत्न करून कौशल्य आत्मसात करावे व या आत्मासात केलेल्या कौशल्याचा वापर करून त्या व्यवसायात वाढ केली आणि स्वत:चे उत्पन्नात लक्षणिय वाढ केली. त्यांच्या या ज्ञानाचा, अनुभवाचा व कौशल्याचा शेतकरी समुहांना फायदा होवू शकतो. त्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून त्यासाठी स्थानिक परिस्थितीनुरूप तंत्रज्ञान विकसित करून त्यासाठीचे कौशल्य आत्मसात केले असल्याने त्यांचेसारखे कौशल्य इतरत्र उपलब्ध होईलच असे नाही. त्यांचेकडे प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष पाहून, त्यांचे अनुभव ऐकल्यावर आणि त्यापासून मिळणारे आर्थिक उत्पन्नाची माहिती मिळाल्यावर त्यांच्यासारखी साधनसामुग्री व सुविधा असलेल्या शेतकऱ्यांना तो व्यवसाय करण्यास प्रोत्साहित करता येईल. त्याचबरोबर त्याच ठिकाणी कौशल्य देखील अनुभवता येईल. स्वत: अनुभव घेतल्याने आणि प्रत्यक्ष पाहिल्याने त्यांचे मानसिकतेमध्ये बदल घडवून आणता येईल. नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकऱ्यांच्या शेतीशाळेचे आयोजन करणेकरीता निवड करतांना पुढील महत्वाच्या बाबी विचारात घ्याव्यात.

1. त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या सुविधा
2. त्यांचा त्या व्यवसायातील अनुभव
3. त्यांनी आत्मसात केलेले कौशल्य, इतरांना शिकविण्याची आवड, त्यासाठी स्वत:कडील सुविधा उपलब्ध करून देणे आणि तंत्रज्ञान इतरांना शिकविण्याची तयारी इ.
4. त्यांचे शेत सहज पोहचता येईल असे असावे.

तेंव्हा वरील महत्वाच्या बाबी विचारात घेऊन जे शेतकरी स्वखुशीने शेतीशाळा आयोजित करणेस व सहकार्य करणेस तयार आहेत, अशांचीच निवड करावी.

नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकऱ्यांची निवड करतांना त्यांचे व त्यांच्या कुटूंबियांचे उपजिविकेचे साधन शेती व पूरक व्यवसायावरच अवलंबून असावे. इतर स्त्रोतातून मिळविलेल्या उत्पन्नावर एखादा व्यवसाय करत असल्यास त्या ठिकाणच्या शेतीशाळा प्रभावी होणार नाहीत. नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी हा शेतीशाळेचा केंद्रबिंदू आहे त्याचे योग्य निवडीवरच शेतीशाळेचे यश अवलंबून राहील.

## 8. तज्ञ, सुलभकर्ते आणि नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी यांचे प्रशिक्षण :

**(वनामती/रामेती/कृषि विज्ञान केंद्र)**

तज्ञ, सुलभकर्ते आणि नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी यांची निवड केल्यावर अशा निवड केलेल्या निवडकेलेल्यांना शेतीशाळा आयोजनाकरीता प्रशिक्षित करायचे आहे. प्रशिक्षण कार्यक्रम वनामती किंवा रामेती येथे आयोजित करण्यात येईल. या करीता वनामती येथे एक प्रकल्प

व्यवस्थापन समिती स्थापन करणेत येईल. ही समिती रामेती स्तरावरील प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन करेल व संपूर्ण कार्यक्रमाचे सनियंत्रण करेल.

तज्ञ, सुलभकर्ते आणि नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी यांचे प्रशिक्षण कार्यक्रमात प्रत्येकाची भूमिका व जबाबदारी, शेत्ीाशाळेतून शिकवावयाचे कौशल्य, द्यावयाचे तांत्रिक ज्ञान, ते देण्यासाठी लागणारा कालावधी व योग्य वेळ, कौशल्य शिकविण्यासाठी वापरात आणावयाची पद्धत, कौशल्य शिकविण्यासाठी सत्र मार्गदर्शिका तयार करणे, शेतीशाळेचे व्यवस्थापन, कृती आराखडा आणि शेतीशाळेच्या खर्चाचे मापदंड इ. वूषयांवर प्रशिक्षण देण्यात येईल.

## 9. शेतीशाळा प्रकल्प व्यवस्थापन समिती :

जिल्हयात आयोजित केल्या जाणाऱ्या शेतीशाळांवर सनियंत्रण करणेकरीता त्याबाबतीत निर्णय घेणेकरीता वनामतीस्तरावर अप्पर संचालक (वि.व्य.) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी. समितीमध्ये अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार संचालक, वनामती यांना राहतील. आवश्यकता भासल्यास धोरणात्मक निर्णयासाठी संस्थेच्या विद्वत्त मंडळ किंवा नियामक मंडळ यांचेकडे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणेत यावा. वनामती स्तरावरील समिती खालीलप्रमाणे नियोजन करेल.

1. तज्ञ, सुलभकर्ते आणि नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी यांचे प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन.
2. प्रशिक्षणाचे स्थळ व तारीख निश्चिती.
3. प्रशिक्षणाची विषय सूची.
4. रामेती स्तरावर आयोजित करायचे प्रशिक्षण कॅलेंडर तयार करून त्यानुसार प्रशिक्षण होतात किंवा नाही याचे सनियंत्रण करेल.
5. शेतीशाळेसाठी बाबनिहाय खर्चाचे मापदंड निश्चित करेल.
6. रामेतिनिहाय आयोजित कार्यक्रमांचा आढावा घेईल.
7. याशिवाय वेळोवेळी निर्माण होणारे अडीअडचणींवर उपाय सूचवेल व सूचना निर्गमित करेल.

रामेतीमध्ये प्राचार्य यांचे अध्यक्ष्यतेखाली शेतीशाळा सनियंत्रण समिती स्थापन करणेत येईल. त्यांचे कार्यक्षेत्रातील शेतीशाळांचे सनियंत्रण करणेची जबाबदारी या समितीची राहिल या समितीमध्ये रामेतीमधील सर्व सहाय्यक संचालक सदस्य राहतील. “ रामेतीस्तरावर शेतीशाळा आयोजनाकरीता

तज्ञ, सुलभकर्ते आणि नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी यांचे प्रशिक्षणाची जबाबदारी प्राचार्य यांची राहिल. या कार्यक्रमांचे योग्य documentation करणे ही देखील प्राचार्यांची जबाबदारी राहिल.

## 10. शेतीशाळांचे आयोजन :

कृषि विभागाचे शेतीशाळांचे आयोजनाकरीता वरील मुद्दा क्र. 1 ते 7 चे बाबतीत संपूर्ण कार्यवाही " उप विभागीय कृषि अधिकारी " यांचे नियंत्रणाखाली तालुका कृषि अधिकारी करतील. शेतीशाळा आयोजित करायची संपूर्ण जबाबदारी संबंधित तालुका कृषि अधिकारी यांची राहिल आणि या शाळा नियोजनानुसार तालुका कृषि अधिकारी यांचे कडून पूर्ण करून घेण्याची जबाबदारी उप विभागीय कृषि अधिकारी यांची राहिल. या योजनेअंतर्गत शेतीशाळा आयोजन करण्याकरीता लागणारा निधी प्रकल्प संचालक, आत्मा यांचे स्तरावर उपलब्ध करून देण्यात येईल.

कृषि विभागाव्यतिरिक्त इतर शेतीशाळांचे आयोजनाकरीता संबंधित विभागाचे जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना निधी प्रकल्प संचालक, आत्मा यांचे स्तरावरून उपलब्ध करून देणेत येईल त्या विभागाच्या शेतीशाळा आयोजित करणेकरीता वरिल मुद्दा क्रमांक 9 मधील 1 ते 7 चे बाबतीत संपूर्ण कार्यवाही त्या विभागाचे जिल्हा प्रमुखाने तालुका स्तरीय अधिकाऱ्यांचे सहकार्याने पूर्ण करायची आहे. (उदा. पशुसंवर्धन, दुग्ध, मत्स्य, रेशीम, खादी ग्रामोद्योग, कृषि विद्यापिठ इ.)

जिल्हास्तरावर आत्मा व्यवस्थापन समितीद्वारे या योजनेतील विविध शेतीशाळांचे नियोजन व सनियंत्रण करणेची जबाबदारी प्रकल्प उप संचालक (आत्मा) यांची राहिल.

उप विभागीय कृषि अधिकारी, सर्व विभांगाचे जिल्हा प्रमुख यांना त्यांचेकडून अपेक्षित कार्यवाहीची जाणीव करून देणेकरीता रामेतीस्तरावर दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करून कृति आराखडा तयार करणेत यावा. जिल्हानिहाय कृति आराखडा तयार करूनच पुढील कार्यक्रमांचे नियोजन करावे.

## 11. प्रशिक्षण आणि शेतीशाळांचे खर्चाचे मापदंड :

शेती कौशल्य शेतीशाळांचे आयोजनापूर्वी वनामती, रामेती स्तरावर कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम, बैठका आयोजित कराव्य लागतील त्यासाठी वनामती व रामेती येथील प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता कृषि विभागाचे अधिकारी/ कर्मचारी यांचे प्रशिक्षणाकरीता जे खर्चाचे मापदंड मंजूर आहेत त्याच दराने खर्च करणेत यावा. सदर खर्च ज्या शेती कौशल्य शेतशाळांचे आयोजनाकरीता (कार्यशाळा, प्रशिक्षण, बैठक) आयोजित केले आहे, त्यासाठी उपलब्ध तरतूदीतून करणेत यावा.

शेती कौशल्य शेतशाळांचे यासाठी पुढील प्रमाणे खर्चाचे मापदंड निश्चीत करणेत आले आहेत.

| अ.क्र. | बाब | दर / प्रतिदिन | पांच दिवसांकरिता |
|---|---|---|---|
| 1 | नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी यांचे मानधन | रू. 400/- | रू. 2000/- |
| 2 | विषय तज्ञाचे मानधन | रू. 400/- | रू. 2000/- |
| 3 | सुलभकर्त्याचे मानधन | रू. 200/- | रू. 1000/- |
| 4 | चहा, जेवण (प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थी) एकूण 35 | रू. 65/- प्रति व्यक्ती | रू. 11375/- |
| 5 | प्रशिक्षणार्थींना द्यायचे साहित्य (किट) प्रशिक्षक शेतकरी (1) प्रशिक्षणार्थी (30) एकूण 31 | रू. 500/- प्रति व्यक्ती | रू. 15500/- |
| 6 | संपूर्ण शेतीशाळेसाठी एकदा करायचा खर्च (प्रशिक्षण व वाचन साहित्य) | रू. 200/- प्रति व्यक्ती | रू. 6000/- |
| 7 | बैठक, पिण्याचे पाणी व इतर प्रासंगिक व्यवस्था | | रू. 7125/- |
| | **एकूण .. ..** | | रू. 45000/- |

वर नमूद केलेल्या बाबनिहाय खर्चाचे मर्यादेतच खर्च करणेत यावा. प्रतिव्यक्ती व प्रतिदिन खर्चाचे मंजूर मापदंडापेक्षा जास्त खर्च करण्यात येवू नये.

प्रशिक्षण कालावधी : प्रशिक्षण कालावधी हा 5 दिवस राहील. व त्यानुसार खर्चाचे मापदंड लागू राहतील व त्याप्रमाणे खर्च करावयाचा आहे.

## 12. प्रशिक्षण कार्यक्रमांचे उप विभाग, जिल्हा, विभाग व राज्य समन्वय राखणे :

उप विभागात आणि जिल्ह्यात कृषि व सलंग्न विभाग, कृषि विद्यापिठ, कृषि विज्ञान केंद्र, स्वयंसेवी संस्था व खाजगी संस्था यांचेशी सतत संपर्कात राहून शेतीशाळा यशस्वी करणेकरीता समन्वय ठेवणे अत्यंत आवश्यक आहे याकरीता

1. उपविभागीय कृषि अधिकारी हे त्यांचे कार्यक्षात्रातील तालुक्यात आयोजित करण्यात येणाऱ्या सर्वच शेतीशाळांचे समन्वयक म्हणून काम करतील व संबंधित सुलभकर्ते नियोजनानुसार शेतीशाळा आयोजित करतात किंवा नाही यावर देखरेख ठेवतील. त्यांचे कार्यक्षेत्रात सर्व विभागाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या तालुका निहाय शेतीशाळांची दिननदर्शिका व मॅन्युअलची प्रत त्यांचेकडे राहिल त्याचप्रमाणे सुलभकर्ते यांचे दूरध्वनी क्रमांक व पत्ते देखील त्यांचेकडे राहतील म्हणजे त्यांना सुलभकर्ते यांचेशी सतत संपर्क साधून माहिती घेता येईल व अडचणी सोडविण्याकरीता संबंधित जिल्हाप्रमुखांकडे पाठपुरावा करता येईल.

2. शेतीशाळा आयोजन करण्याकरीता निवड केलेल्या विभागांशी तसेच कृषि विज्ञान केंद्र, अशासकीय/खाजगी संस्था यांचेशी जिल्हास्तरावर समन्वय ठेवण्याची जबाबदारी प्रकल्प संचालक, आत्मा यांचे अधिनस्त प्रकल्प उपसंचालक यांची राहिल त्या विभागाचे जिल्हा प्रमुखांशी संपर्कात राहून जिल्हास्तरावरील अडचणी सोडविण्याकरीता पाठपूरावा करतील यासाठी ते उपविभागीय कृषि अधिकारी यांचेशी सतत संपर्क ठेवतील.

3. विभागीय स्तरावर विभागीय कृषि सहसंचालक यांचे अधिनस्त उपसंचालक आत्मा, सामेती समन्वयक म्हणून काम करतील. जिल्हास्तरावरील अडचणींचा निपटारा होत नसल्यास संबंधित विभागाचे विभागीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तात्काळ निपटारा करणेसाठी पाठपूरावा करतील. विभागातील अडचणी कोणत्याही परिस्थितीत जिल्हा, विभागस्तरावर वेळीच सोडविल्या जातील, यासाठी त्यांनी जिल्हा स्तरावरील समन्वयक उपसंचालक सामेती यांचे कायम संपर्कात राहणे आवश्यक आहे.

4. या योजनेकरीता संचालक, आत्मा आंहरण व संवितरण अधिकारी असतील.

## 13. कौशल्यवृद्धी प्रशिक्षणाकरीता निधी उपलब्धता :

शेती पूरक व्यवसायासाठी शेती कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राज्यातील 33 जिल्ह्यातील शेतकऱ्यांकरीता प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करायचे आहेत. यासाठी वितरीत करावयाच्या बाबनिहाय निधीचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **बाब** | | **संस्था** |
|---|---|---|---|
| 1) | तज्ञ / सुलभकर्ते / नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी याचेसाठी कार्यशाळा | | वनामती नागपूर |
| 2) | विभागीय स्तरावरील तज्ञ / सुलभकर्ते / नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी यांचेसाठी कार्यशाळा | | रामेती |
| 3) | प्रचार प्रसिध्दी व डॉक्युमेंटेशन | अ) | विभागीय कृषि सहसंचालक |
| | | ब) | कृषि आयुक्तालय स्तर |
| 4) | कौशल्य आधारीत शेती कौशल्य शेती शाळा | | प्रकल्प संचालक,आत्मा स्तर |

वरील नमूद मुद्दा क्रमांक 13 (1) व 13 (2) बाबीसाठी निधी वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था नागपूर स्तरावर उपलब्ध करून देण्यात येईल. त्यापैकी मुद्दा क्रमांक 13 (2) बाबीचा निधी वनामती, नागपूर मार्फत सर्व रामेती स्तरावर उपलब्ध करावयाचा आहे. तसेच मुद्दा क्रमांक 13 (3) अ आणि 13 (4) बाबीता निधी विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर उपलब्ध करून देण्यात येईल. त्यापैकी मुद्दा क्रमांक 13 (4) बाबीचा निधी विभागीय कृषि सहसंचालक यांचे मार्फत सर्व प्रकल्प संचालक, आत्मा स्तरावर उपलब्ध करावयाचा आहे. कृषि विभागाव्यतिरिक्त इतर विभागांचे बाबतीत प्रकल्प संचालक, आत्मा यांनी विभागनिहाय मंजूर शेतीशाळांचे संख्यानुसार संबंधित विभागांना निधी आहरीत करून उपलब्ध करावयाचा आहे.

या निधीतून कौशल्यवृद्धी शेतीशाळा आयोजित करणेकरीता सुलभकर्ते यांना शेतीशाळेचे नियोजन कार्यक्रमानुसार अग्रीम देण्यात येईल. अग्रीम देताना खर्चाचे मापदंडानुसारच अग्रीम देणेत यावा व तो खर्च करणेचे संपूर्ण अधिकार सुलभकर्ते यांना राहतील.

सुलभकर्ते यांनी अग्रीम खर्च करताना खर्चाच्या मापदंडाच्या मर्यादेतच खर्च करावा. खर्च करतांना वित्तीय नियमंाचे पालन व पूर्तता करूनच खर्च करायचा आहे. प्रत्येक अग्रीमाचा बाबनिहाय खर्चाचा तपशिल व मूळपावत्या अखर्चित रकमेसह अग्रीम मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यास ते सादर करतील, व त्या बरोबर आर्थिक व भौतिक अहवाल देतील. अशाप्रकारे शेतीशाळा पूर्ण झाल्यावर संपूर्ण शेतीशाळांचा एकत्रित अहवाल सुलभकर्ता तयार करेल. त्यामध्ये आर्थिक व भौतिक अहवाल तयार करायचा आहे. खर्चाचे मापदंड हे त्या वर्षाकरीता खर्चाची कमालमर्यादा आहे व तो प्रत्यक्ष उपस्थितीनुसार (अपवाद वगळता) राहिल.

शेती कौशल्य शेतीशाळेच्या आयोजनाबाबत जिल्हानिहाय भौतिक व आर्थिक तरतूदीचे लक्षांक बाबत माहिती प्रपत्र 2 मध्ये दर्शविण्यात आली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करून शेतीशाळा यशस्वीप्रमाणे राबविण्यात याव्यात. याबाबतचा भौतिक / आर्थिक साध्याबाबतचा अहवाल दरमहा दिनांक 5 पर्यंत आयुक्तालयास सादर करणेत यावा.

**सोबत** - प्रपत्र 1/ प्रपत्र 2

**संचालक, आत्मा**

**कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे**

**00000**

जा.क्र. शेतीशाळा / मासू 13-14/विप्र.5/343 /2013
कृषि आयुक्तालय, म.रा.
पुणे 4011 005, दिनांक 15 मे, 2013.

**प्रत - माहितीस्तव सविनय सादर.**

1) मा. प्रधान सचिव (कृषी), कृषि व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई 32 यांचेकडे माहितीस्तव सविनय सादर.

2) मा. संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रत - माहितीसाठी व आवश्यक त्या शिघ्र कार्यवाहीसाठी अग्रेषित.

3) विभागीय कृषि सहसंचालक (सर्व) ------------ यांना माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित.

4) उपसंचालक सामेती --------------- विभाग

5) प्रकल्प संचालक, आत्मा -------------- जिल्हा

6) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी -------------- ( सर्व) यांना माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित.

7) प्रादेशिक कृषि विस्तार व व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (सर्व) -----------

8) सर्व प्रमुख --------------- संलग्न संस्था

**संचालक, आत्मा**
**कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे**

शेती पुरक व्यवसायाकरिता कौशल्य विकास शेती शाळा 2013-14 मध्ये आयोजित बाबनिहाय तपशिल व आर्थिक तरतूदीची माहिती

**प्रपत्र 1**

(रु. लाख)

| अ. क्र. | बाब | दर | भौतिक लक्ष्य | तरतूद | निधी वाटप स्तर |
|---|---|---|---|---|---|
| अ) 1 | तज्ञ / सुलभकर्ते / नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी याचेसाठी कार्यशाळा ( वनामती स्तर ) | रू.5,0000/- (प्रति कार्यशाळा) (50 प्रशिक्षणार्थी x रू. 500/- प्रति दिन क्ष 2 दिवस) | 3 | 1.50 | वनामती स्तर |
| 2 | विभागीय स्तरावरील तज्ञ / सुलभकर्ते / नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी याचेसाठी कार्यशाळा ( रामेती स्तर ) | रू. 24500/- (35 प्रशिक्षणार्थी x रू. 350/- प्रति दिन x रू. 2 दिवस) | 7 रामेती स्तरावरील कार्यशाळा | 1.72 | रामेती सर्व |
| 3 | प्रचार प्रसिध्दी व डॉक्युमेटेंशन | रू. 25000/- | 8 | 2.00<br>0.23 | विकृससं<br>कृ.आ. |
| ब) | कौशल्य आधारीत शेती कौशल्य शेती शाळा | 45000/- प्रति कार्यशाळा (जास्ती जास्त) | 99 | 44.55 | जिल्हा स्तर |
| एकूण | | | | 50.00 | |

**शेती पूरक व्यवसायासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम 2013-14**
**प्रस्तावित कार्यक्रम**

(रु. लाख)

| अ. क्र. | बाब | दर | भौतिक लक्ष्य | तरतूद | निधी वाटप स्तर |
|---|---|---|---|---|---|
| अ) 1 | तज्ञ / सुलभकर्ते / नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी याचेसाठी कार्यशाळा( वनामती स्तर ) | 50,000/- (प्रति कार्यशाळा) | 6 (50 प्रशिक्षणार्थी x रू. 500/- प्रति दिन x 2 दिवस) | 3.00 | वनामती स्तर |
| 2 | विभागीय स्तरावरील तज्ञ / सुलभकर्ते / नाविन्यपूर्ण यशस्वी शेतकरी याचेसाठी कार्यशाळा ( रामेती स्तर ) | 24000/- (प्रति कार्यशाळा) 5 बॅचसाठी 2 दिवस | 7 रामेती स्तरावरील कार्यशाळा (35 प्रशिक्षणार्थी x रू. 350/- प्रति दिन x 2 दिवस) | 8.40 (प्रती रामेती रू.1.20 लाख प्रमाणे) | रामेती स्तर |
| 3 | प्रचार प्रसिध्दी व डॉक्युमेटेंशन<br><br>संकीर्ण | विकृससं<br><br>कृषि आयुक्तालय | 8 | 1.80<br><br>1.80 | विकृससं<br><br>क.आ. |
| ब) | कौशल्य आधारीत शेती कौशल्य शेती शाळा | 45000/- प्रति शेतीशाळा | 1300 शेतीशाळा | 585.00 | जिल्हा स्तर |
| **एकूण** | | | | 600.00 | |

## शेतीशाळेमध्ये सहभागी होणेकरीता करावयाचे अर्जाचा नमुना

1. अर्जदाराचे संपूर्ण नांव :
   वय :
   शिक्षण :
   गांव :
   ता. :
   जि. :

2. दूरध्वनी/ भ्रमणध्वनी क्र. :

3. पत्रव्यवहाराचा पत्ता :

4. धारण केलेली जमिन :

5. जमिनीचा प्रकार :

6. बारमाही सिंचन खाली :

7. हंगामी सिंचन खाली :

8. कोरडवाहू :

9. सिंचनाचे साधन : बारमाही क्षेत्र हंगामी क्षेत्र एकूण क्षेत्र

   धरणापासून :

   विहीर :

   शेततळे :

   नाल्याहून :

नदीहून :

10. यापूर्वी घेतेलेले व्यवसाय प्रशिक्षण

अ. व्यवसायाचे नांव

ब. कालावधी

क. संस्था

11. कृषि मशिनरी

ट्रॅक्टर

पॉवर थ्रिलर

पॉवर स्प्ेाअर

थ्रेशर

12. कृषि अवजारे : इंधनावर चालणारे मनुष्य बळावर चालणारे एकूण

1.

2.

3.

4.

5.

6.

7.

13. सध्याची पीक पद्धती / पीक रचना

मनुष्य बळ :

कुटूंबातील व्यक्ती प्रौढ : पुरूष

स्त्रिया

बाल : मुल

मुली

14. जनावरे : प्रजाती

बैल

गायी

म्हशी

शेळ्या

मेंढ्या

15. पक्षी

कोंबड्या

बदक

16. शेती व पूरक व्यवसायातील अनुभव

अ. पारंपारिक शेती

ब. भाजीपाला उत्पादन

क. पुष्पोत्पादन

ड. दुग्धव्यवसाय

इ. मत्स्योत्पादन

फ. कुक्कुटपालन

ग. शेळीपालन

ह. मेंढीपालन

ल. मधुमक्षिकापालन

ज. रेशिम उद्योग

17. रोपवाटीका

फळझाडे

फुलझाडे

शोभिवंत

18. बटेर पालन

मशरूम उत्पादन

भाजीपाला रोपवाटीका

शेडनेट मध्ये भाजीपाला

शेडनेट मध्ये पुष्पोत्पादन

पॉलीनेटमधील पुष्पोत्पादन

रोपवाटीका

19. शेतमाल प्रक्रीया उद्योग

20. मसाला पीक उत्पादन

21. औषधी / सुगंधी वनस्पती उत्पादन

22. औषधी / सुगंधी वनस्पती प्रक्रीया

23. अपारंपारिक उर्जेची साधने

(उदा. गोबर गॅस, सोलर कुकर, दिवे इ.)

24. लाभ घेतलेल्या योजना

25. बाजारपेठ

26. प्रशिक्षण कोणत्या व्यवसायात घेऊ इच्छितात व का ?

27. बचत गटाचे नांव

**सही/-**

**हमीपत्र**

मी, ----------------------------------------------------- राहणार ---------------------------- तालुका -------------, जिल्हा ---------------- लिहून देतो की, माझी मी लिहून दिलेल्या व्यवसायातील प्रशिक्षणाकरीता निवड झाल्यास त्यासाठी ठरवून दिलेल्या दिवशी स्वखर्चाने उपस्थित राहील. मी प्रशिक्षणाचे दिवशी पूर्ण वेळ उपस्थित राहून सक्रीय सहभाग घेईल व कौशल्य आत्मसात करीन. प्रशिक्षणाच्या संपूर्ण कार्यक्रमात मी स्वखर्चाने हजर राहण्याची हमी देतो व प्रात्यक्षिकाची मला सांगितलेली अंग मेहनतीची कामे मी स्वत: स्वखुशीने करण्यास तयार आहे. मी तसे न केल्यास मला प्रशिक्षणातून काढून टकण्यात येईल. याची मला संपूर्ण कल्पना आहे. मला प्रशिक्षणातून काढून टाकल्यास माझी कुठलीही तक्रार राहणार नाही.

प्रशिक्षणातून आत्मसात केलेल्या कौशल्याचा वापर मी स्वत:चे व्यवसाय सुरू करणे करीता / सध्याचे व्यवसायात सुधारणा करणे करीता करेन.

**सही/-**

## शेती पूरक व्यवसायासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम 2013-14

| अ. क्र. | जिल्हा | शेतीशाळा लक्षांक | | |
|---|---|---|---|---|
| | | भौतिक | शेतकरी | आर्थिक (रू.लाखात) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | ठाणे | 3 | 90 | 1.35 |
| 2 | रायगड | 3 | 90 | 1.35 |
| 3 | रत्नागिरी | 3 | 90 | 1.35 |
| 4 | सिंधुदुर्ग | 3 | 90 | 1.35 |
| | **कोकण विभाग** | **12** | **360** | **5.4** |
| 5 | धुळे | 3 | 90 | 1.35 |
| 6 | नाशिक | 3 | 90 | 1.35 |
| 7 | नंदुरबार | 3 | 90 | 1.35 |
| 8 | जळगांव | 3 | 90 | 1.35 |
| | **नाशिक विभाग** | **12** | **360** | **5.4** |
| 9 | अहमदनगर | 3 | 90 | 1.35 |
| 10 | पुणे | 3 | 90 | 1.35 |
| 11 | सोलापूर | 3 | 90 | 1.35 |
| | पुणे विभाग | 9 | 270 | 4.05 |
| 12 | सातारा | 3 | 90 | 1.35 |
| 13 | कोल्हापूर | 3 | 90 | 1.35 |
| 14 | सांगली | 3 | 90 | 1.35 |
| | **कोल्हापूर विभाग** | **9** | **270** | **4.05** |
| 15 | औरंगाबाद | 3 | 90 | 1.35 |
| 16 | जालना | 3 | 90 | 1.35 |
| 17 | बीड | 3 | 90 | 1.35 |
| | **औरंगाबाद विभाग** | **9** | **270** | **4.05** |
| 18 | परभणी | 3 | 90 | 1.35 |
| 19 | लातूर | 3 | 90 | 1.35 |
| 20 | उस्मानाबाद | 3 | 90 | 1.35 |
| 21 | नांदेड | 3 | 90 | 1.35 |
| 22 | हिंगोली | 3 | 90 | 1.35 |
| | **लातूर विभाग** | **15** | **450** | **6.75** |
| 23 | अमरावती | 3 | 90 | 1.35 |
| 24 | अकोला | 3 | 90 | 1.35 |
| 25 | वाशिम | 3 | 90 | 1.35 |
| 26 | बुलढाणा | 3 | 90 | 1.35 |
| 27 | यवतमाळ | 3 | 90 | 1.35 |
| | **अमरावती विभाग** | **15** | **450** | **6.75** |
| 28 | नागपूर | 3 | 90 | 1.35 |
| 29 | वर्धा | 3 | 90 | 1.35 |
| 30 | भंडारा | 3 | 90 | 1.35 |
| 31 | गोंदिया | 3 | 90 | 1.35 |
| 32 | चंद्रपूर | 3 | 90 | 1.35 |
| 33 | गडचिरोली | 3 | 90 | 1.35 |
| | **नागपूर विभाग** | **18** | **540** | **8.1** |
| | **एकूण** | **99** | **2970** | **44.55** |